# (२४) समाजशास्त्र (माध्यम मराठी व इंग्रजी)

<table>
<tr><th colspan="2">पेपर-एक (विषय सांकेतांक - १०५५)</th></tr>
<tr><td colspan="2"><u>समाजशास्त्राची मूलभूत तत्वे</u></td></tr>
<tr><td>१</td><td><u>समाजशास्त्र-एक ज्ञान शाखा</u><br>(अ) युरोपातील आधुनिकता आणि सामाजिक परिवर्तन व समाजशास्त्राचा उदय.<br>(ब) विषयाची व्याप्ती व इतर सामाजिक शास्त्रांशी तुलना.<br>(क) समाजशास्त्र आणि सामान्य व्यवहार ज्ञान.</td></tr>
<tr><td>२</td><td><u>समाजशास्त्र- एक विज्ञान</u>:<br>(अ) शास्त्र, शास्त्रीय पद्धत व मीमांसा.<br>(ब) संशोधन पद्धतीशास्त्रातील मुख्य सैद्धांतिक प्रवाह.<br>(क) प्रत्यक्षार्थवाद आणि त्याची मीमांसा.<br>(ड) तथ्ये, मूल्ये व वस्तुनिष्ठता.<br>(ई) प्रत्यक्षार्थवादा व्यतिरिक्तची पद्धतीशास्त्रे.</td></tr>
<tr><td>३</td><td><u>संशोधन पद्धती आणि विश्लेषण</u>:<br>(अ) गुणात्मक व संख्यात्मक पद्धती.<br>(ब) तथ्य संकलनाची तंत्रे.<br>(क) चल, नमुनापद्धत, गृहीतकृत्य, विश्वसनीयता आणि वैधता.</td></tr>
<tr><td>४</td><td><u>समाजशास्त्रीय विचारवंत:</u><br>(अ) कार्ल मार्क्स- ऐतिहासिक भौतिकवाद, उत्पादनाच्या पद्धती, परात्मीकरण, वर्गसंघर्ष.<br>(ब) एमिल दुरखिम- श्रम विभाजन, सामाजिक तथ्य, आत्महत्या, धर्म व समाज.<br>(क) मॅक्स वेबर- सामाजिक क्रिया, आदर्श प्रकार, अधिकार, नोकरशाही, प्रोटेस्टंट नितीतत्वे आणि भांडवलशाहीचा आत्मा.<br>(ड) टॅल्कोल्ट पार्सन्स- सामाजिक व्यवस्था, प्रतिरुप चल घटक.<br>(इ) रॉबर्ट के.मर्टन- अप्रकट व प्रकट कार्ये, अनुचलन व विचलन, संदर्भ समूह.<br>(फ) मीड - स्व आणि अस्मिता.</td></tr>
<tr><td>५</td><td><u>स्तरीकरण आणि गतिशीलता</u>:<br>(अ) संकल्पना- समानता, असमानता, श्रेणीरचना, वर्जितता, दारिद्य व वंचितता.<br>(ब) सामाजिक स्तरीकरणाचे सिद्धांत- संरचनात्मक-प्रकार्यवादी, मार्क्सवादी सिद्धांत, वेबरचा सिद्धांत<br>(क) आयाम-वर्गाची सामाजिक स्तरीभवन, दर्जात्मक समूह, लिंगभाव, वांशिकता आणि वंश (वांशिकता)<br>(ड) सामाजिक गतिशीलता-मुक्त आणि बंदिस्त प्रणाली, गतिशीलतेचे प्रकार, गतिशीलतेचे स्रोत व कारणे.</td></tr>
<tr><td>६</td><td><u>कार्य आणि आर्थिक जीवन</u>:<br>(अ) विविध प्रकारच्या समाजातील कार्यांचे सामाजिक संघटन- गुलामगिरीचा समाज, सरंजामशाही समाज, औद्योगिक भांडवलशाही समाज.<br>(ब) कार्याचे औपचारिक व अनौपचारिक संघटन.<br>(क) श्रम आणि समाज.</td></tr>
<tr><td>७</td><td><u>राजकारण व समाज</u><br>(अ) सत्तेचे समाजशास्त्रीय सिद्धांत.<br>(ब) सत्ताधारी अभिजन, नोकरशाही, दबावगट व राजकीय पक्ष.<br>(क) राष्ट्र, राज्य, नागरिकत्व, लोकशाही, नागरी समाज, विचार प्रणाली.<br>(ड) निषेध, आंदोलन, सामाजिक चळवळी, सामूहिक कृती, क्रांती.</td></tr>
<tr><td>८</td><td><u>धर्म व समाज</u><br>(अ) धर्माचे समाजशास्त्रीय सिद्धांत.<br>(ब) धार्मिक प्रथांचे प्रकार: आत्मवाद, एकतत्ववाद, बहुतत्ववाद, संप्रदाय,पंथ, उपासना पद्धती.<br>(क) आधुनिक समाजातील धर्म: धर्म आणि विज्ञान, धर्मनिरपेक्षता, धार्मिक पुनरुज्जीवनवाद, मूलतत्त्ववाद.</td></tr>
<tr><td>९</td><td><u>नातेसंबंधाच्या पद्धती</u><br>(अ) कुटुंब, घरदार, विवाह</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| | (ब) कुटुंबाचे प्रकार आणि स्वरूप.<br>(क) वंशावळ व वंशपरंपरा.<br>(ड) पितृसत्ताक पद्धती आणि लिंगाधारित श्रमविभागणी.<br>(इ) समकालीन कल. |
| **१०** | **<u>आधुनिक समाजातील सामाजिक बदल</u>:**<br>(अ) सामाजिक परिवर्तनाचे समाजशास्त्रीय सिद्धांत.<br>(ब) विकास आणि परावलंबन.<br>(क) सामाजिक परिवर्तनाचे कर्ते.<br>(ड) शिक्षण आणि सामाजिक परिवर्तन.<br>(इ) विज्ञान, तंत्रज्ञान आणि सामाजिक परिवर्तन. |

| **पेपर-दोन (विषय सांकेतांक-१०५६)** | |
|---|---|
| | **<u>भारतीय समाज: संरचना आणि परिवर्तन</u>** |
| अ. | **भारतीय समाजाची ओळख:**<br>(१) **भारतीय समाजाच्या अध्ययनाचे परिप्रेक्ष्य.**<br>(अ) प्राच्यविद्याशास्त्र (जी.एस.घुर्ये)<br>(ब) संरचनात्मक प्रकार्यवाद (एम.एन. श्रीनिवास)<br>(क) मार्क्सवादी समाजशास्त्र (ए.आर. देसाई)<br>(२) **वसाहतवादी राजवटीचा भारतीय समाजावरील परिणाम :**<br>(अ) भारतीय राष्ट्रवादाची सामाजिक पार्श्वभूमी<br>(ब) भारतीय परंपरेचे आधुनिकीकरण<br>(क) वसाहतवादी कालखंडादरम्यानचा विद्रोह व चळवळी<br>(ड) सामाजिक सुधारणा |
| ब. | **<u>सामाजिक संरचना</u>**<br>(१) **ग्रामीण व कृषक सामाजिक संरचना:**<br>(अ) भारतीय खेड्यांची कल्पना व खेड्यांचा अभ्यास<br>(ब) कृषक समाज संरचना- भू-धारणा पद्धतीची उत्क्रांति, जमिन सुधारणा.<br>(२) **जाती व्यवस्था**<br>(क) जाती व्यवस्था अभ्यासाचे परिप्रेक्ष्य: जी.एस.घुर्ये, एम.एन.श्रीनिवास, लुई ड्युमाँ, आन्द्रे बेत्ती.<br>(ब) जाती व्यवस्थेची वैशिष्ट्ये.<br>(क) अस्पृश्यता- स्वरूप व परिप्रेक्ष्य.<br>(३) **भारतातील आदिवासी समुदाय**<br>(अ) परिभाषीय समस्या<br>(ब) भौगोलिक विस्तार<br>(क) वसाहतवादी धोरणे व जमाती<br>(ड) एकात्मतेचे आणि स्वायत्ततेचे प्रश्न<br>(४) **भारतातील सामाजिक वर्ग**<br>(अ) कृषक वर्गीय संरचना<br>(ब) औद्योगिक वर्ग संरचना<br>(क) भारतातील मध्यमवर्ग<br>(५) **भारतातील नातेसंबंधी पध्दती**<br>(अ) भारतीय वंशावळ व वंशपरंपरा<br>(ब) नातेसंबंधाचे प्रकार<br>(क) भारतीय कुटुंब व विवाह पद्धती<br>(ड) कुटुंबाचा घरदारविषयक पैलू<br>(इ) पितृसत्ताक पद्धती, हक्क व लिंगाधारित श्रमविभागणी |

| | |
|---|---|
| | (६) **धर्म व समाज**<br>(अ) भारतातील धार्मिक समुदाय<br>(ब) धार्मिक अल्पसंख्याक समुदायांच्या समस्या |
| **क.** | **भारतातील सामाजिक परिवर्तन:**<br>(१) **भारतातील सामाजिक परिवर्तनाची दृष्टी:**<br>(अ) विकासासाठीच्या नियोजनाची कल्पना व मिश्र अर्थव्यवस्था<br>(ब) संविधान, कायदा व समाज परिवर्तन<br>(क) शिक्षण आणि समाजपरिवर्तन<br>(२) **भारतातील ग्रामीण व कृषक स्थित्यंतर:**<br>(अ) ग्रामविकास कार्यक्रम, समुदाय विकास कार्यक्रम, सहकारी संस्था, दारिद्रय निर्मूलन योजना.<br>(ब) हरितक्रांती आणि सामाजिक परिवर्तन<br>(क) भारतीय कृषीक्षेत्रातील उत्पादनाच्या बदलत्या पद्धती<br>(ड) ग्रामीण श्रमिकवर्ग, गुलामी, स्थलांतर.<br>(३) **भारतातील औद्योगीकीकरण व नागरीकरण**<br>(अ) भारतातील आधुनिक उद्योगाची उत्क्रांती<br>(ब) भारतात नागरी वसाहतींची वाढ<br>(क) कामगार वर्ग: संरचना, वाढ, वर्गीय गतिशीलता<br>(ड) अनौपचारिक क्षेत्र, बाल कामगार<br>(इ) शहरी क्षेत्रातील झोपडपट्टया व त्यांची वंचितता.<br>(४) **राजकारण व समाज:**<br>(अ) राष्ट्र, लोकशाही आणि नागरिकत्व<br>(ब) राजकीय पक्ष, दबाव गट, सामाजिक व राजकीय अभिजन<br>(क) प्रादेशिकतावाद व सत्तेचे विकेंद्रीकरण<br>(ड) निधर्मीकरण<br>(५) **आधुनिक भारतातील सामाजिक चळवळी:**<br>(अ) कृषक चळवळी व शेतकरी आंदोलन<br>(ब) स्त्रियांच्या चळवळी<br>(क) मागासवर्ग व दलित चळवळी<br>(ड) पर्यावरणीय चळवळी<br>(इ) वांशिकता व अस्मितेवर आधारलेल्या चळवळी<br>(६) **लोकसंख्या गतितत्व:**<br>(अ) लोकसंख्या आकारमान, वाढ, रचना व वितरण<br>(ब) लोकसंख्या वाढीचे घटक: जन्म, मृत्यू, स्थलांतर<br>(क) लोकसंख्या धोरण व कुटुंब नियोजन<br>(ड) अलिकडे उद्भवलेले प्रश्न: वृद्धत्व, लिंगदर, बालमृत्यूदर व शिशूमृत्यूदर, प्रजोत्पादक आरोग्य.<br>(७) **सामाजिक स्थित्यंतराच्या समस्या** :<br>(अ) विकासाचे अरिष्ट: विस्थापन, पर्यावरणीय प्रश्न व शाश्वतता.<br>(ब) दारिद्र्य, वंचितावस्था व विषमता<br>(क) महिलांवर हिंसाचार<br>(ड) जातीय संघर्ष<br>(इ) वांशिक संघर्ष, धर्माधारित संघर्ष, धार्मिक पुनरुज्जीवनवाद<br>(फ) निरक्षरता व विषमता |

**टिप: उपरोक्त सर्व विषयांचा इंग्रजी भाषेतील अभ्यासक्रम अंतिम व अधिकृत समजण्यात येईल.**